Annexure- I

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Nursing Faculty**
**Information of Subject-wise Intake as per College & University Recognition, Permitted Seat-Matrix Chart Academic Year 2024 - 2025**

**Name of College : HOLY SPIRIT INSTITUTE OF NURSING EDUCATION**

| **UG Degree/PG Degree** | **Intake as per University /Council** | **Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio (1:5)** |
|---|---|---|
| | **Degree** | **Degree** |
| **UG Degree :** B. Sc (Nursing) | 30 | NA |
| P. B. B. Sc (Nursing) | 20 | NA |
| **PG Degree :** M.Sc. (Nursing) | N/A | |
| Medical Surgical Nursing (Fundamental Nursing + Nutrition) | - | |
| Community Health Nursing | - | |
| Obstetric and Gynecological Nursing | - | |
| Child Health Nursing | - | |
| Psychiatric Nursing/Mental Health Nursing | - | |

**Any Other, Please Specify:**

.....................................................................................................................................

.....................................................................................................................................

.....................................................................................................................................

.....................................................................................................................................

**Date:10/01/2024**

**Dean/ Principal Stamp & Signature**

PRINCIPAL
Holy Spirit Institute of Nursing Education,
Holy Spirit Hospital,
Mahakali Caves Road, Andheri (East),
Mumbai - 400 093.

बी.एस.सी. (नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता.
होली स्पिरीट हॉस्पिटल, अंधेरी, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र.एनयूआर-१३०५/प्र.क्र.-१८/०५/शिक्षण-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक: १ सप्टेंबर, २००५

वाचा: शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक:एनयूआर-१३०५/प्र.क्र.१८/०५/शिक्षण-१, दिनांक १९.८.२००५

**शासन निर्णय** :- संदर्भीय दिनांक १९.८.२००५ च्या शासन निर्णयान्वये होली स्पिरीट हॉस्पिटल, अंधेरी, मुंबई. या संस्थेस भारतीय परिचर्या परिषदेने मुंबई येथे सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षाकरिता बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी ३० विद्यार्थी प्रवेश करण्यास मान्यता दिली आहे. तथापि, सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षा ऐवजी सदर संस्थेस सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात ३० विद्यार्थी प्रवेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. मात्र, बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु व्हावयाची आहे. हे विचारात घेऊन संस्थेत सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी.(नर्सिंग) या अभ्यासक्रमाचे ३० विद्यार्थी प्रवेश करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. त्या संबंधीच्या अटी व शर्ती दिनांक १९.८.२००५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

सक्षम प्राधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सदर संस्थेस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संलग्निकरण दिल्यानंतर सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात ३० विद्यार्थी प्रवेश करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भा.र.गांवित)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमार, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमार, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

A:\gr.doc/21

पी.बी.बीएस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्याबाबत...

होली स्पिरिट इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, अंधेरी या महाविद्यालयास परवानगी देण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एनयुआर-२०१३/प्र.क्र.०८/१३/शिक्षण-१
९वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- १८/१०/१४

वाचा :
१) शासनाचे समक्रमांकित दि.१५/०४/२०१३ चे आवश्यकता प्रमाणपत्र
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्रमांक एमयुएचएस/ पीबी/ युजी/नर्सिंग/कंसेंट/६३१/२०१३, दिनांक २४/०७/२०१३.
३) सचिव, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे क्रमांक फाईल ०२/मे/२०१४, दिनांक १७/०५/२०१४ चे पत्र.

**प्रस्तावना:**

**होली स्पिरिट इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, अंधेरी** येथे ३० (तीस) विद्यार्थी क्षमतेसह पी.बी.बीएस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संदर्भ क्रमांक (१) अन्वये "आवश्यकता प्रमाणपत्र" देण्यात आले होते. त्यानुषंगानें संदर्भ क्रमांक (२) नुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संस्थेस संलग्निकरण दिले आहे. तसेच संदर्भाधीन क्रमांक (३) अन्वये सदर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये भारतीय परिचर्या परिषदेने २० (वीस) विद्यार्थी प्रवेशासाठी मान्यता दिलेली आहे. सबब संस्थेच्या पी.बी.बीएस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून २० (वीस) विद्यार्थी क्षमतेसाठी मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

**होली स्पिरिट इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, अंधेरी या महाविद्यालयास** भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून **२० (वीस)** विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बीएस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास दिलेली मान्यता विचारात घेऊन पुढील अटी व शर्थींच्या अधीनतेने याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्थी:**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.
२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.
३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशन प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.
५) शासकीय नियम /कायदा, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
६) संस्था त्यांच्या शासकीय वैद्यकीय /दंत/ परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवा निवृत्त अथवा स्वेच्छासेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही याबाबतचे रू.५०/- च्या स्टँप पेपरवरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.
७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी पी.बी.बीएस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.
८) संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

१०) संस्थेने पी.बी.बीएससी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतर विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१२) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नयेत.

१३) संस्थेला गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

१४) भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची महाविद्यालयास अनुक्रमे मान्यता व संलग्निकरण जोपर्यंत आहे, तोपर्यंत हा शासन निर्णय वैध असेल.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पराग वाकडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव:-

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, इएसआयसी रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड, मुंबई ४०० ०८०.
प्राचार्य, होली स्पिरिट इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, अंधेरी
मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-१).